


■ आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेचे उद्घाटन रॉबर्ट कार्नी यांच्या हस्ते वृक्षपूजन व दीप प्रज्वलनाने शनिवारी झाले. यावेळी उपस्थित राहुल रंजन महिवाल, प्रा. प्रियानंद आगळे, अतुल्यरत्न थेरो, बिजूडकर, उमाशंकर प्रसाद, कालिचरण खडतरे आदी.

# पर्यावरण रक्षणासाठी लोकचळवळीचा निर्धार

औरंगाबाद, दि.१९ (लोकमत ब्युरो)- पर्यावरण रक्षणासाठी लोकचळवळ उभारण्याचा निर्धार इको नीडस् फाऊंडेशनच्या आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेत आज येथे व्यक्त करण्यात आला.

अमेरिकेचे शास्त्रज्ञ रॉबर्ट कार्नी यांच्या हस्ते वृक्षपूजनाने परिषदेचे उद्घाटन झाले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल रंजन महिवाल, श्रीलंकेचे खा. भदन्त अतुल्यरत्न थेरो, इको नीडस्चे अध्यक्ष प्रा. प्रियानंद आगळे, प्राप्तीकर खात्याचे सहायक आयुक्त उमाशंकर प्रसाद, सीमा शुल्क खात्याचे सहायक आयुक्त कालिदास खडतरे, नाबार्डचे बिजूडकर, डॉ. व्ही.एम. जमधडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. शाहीर अरविंद इंगळे यांच्या पर्यावरणावरील पोवाड्याने कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रा. आगळे यांनी इको नीडस् संस्थेची माहिती देऊन पर्यावरण रक्षणासाठी लोकचळवळ उभारण्यावर आपल्या भाषणात भर दिला. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीने नैसर्गिक गरजांचा मर्यादित वापर करण्याबरोबरच भोगवादातून बाहेर येण्याची गरज असल्याचे अतुल्यरत्न थेरो यांनी सांगितले. चक्रीवादळाच्या वारंवार तडाख्यामुळे होणाऱ्या विध्वंसानंतर वसाहतींची पुनर्उभारणी करण्याऐवजी अमेरिका सरकार नवीन शहरे वसवते. त्यामुळे नैसर्गिक साधनसामुग्रीचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असल्याची खंत कार्नी यांनी व्यक्त केली. विकासकामे करताना होणारे पर्यावरणाचे नुकसान जास्तीत जास्त वृक्ष लागवड करून तसेच अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर करून कमी करू शकतो, असे महिवाल यांनी स्पष्ट केले. पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करणाऱ्यांना याप्रसंगी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

### आज समारोप

पर्यावरण परिषदेचा रविवारी समारोप होणार आहे. मॅगासेसे पुरस्कार विजेते प्रा. राजेंद्रसिंह, खा. चंद्रकांत खैरे, खा. भाऊसाहेब वाकचौरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.